**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, 3 रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - 400 614.
दिनांक 11 मे 2018.

**<u>कार्यक्रम पत्रिका</u>**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>मे महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक 18 मे 2018 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1.** इतिवृत्त कायम करणे. (शनिवार, दिनांक 17 फेब्रुवारी 2018 (भाग II - मुळसभा- बुधवार, दिनांक 20 डिसेंबर 2017))

**2.** प्रश्नोत्तरे (यादी सोबत प्रसृत करण्यांत येत आहे).

**3. स्थायी समितीचा, दिनांक 20 एप्रिल 2018 चा ठराव क्र. 365 :-**

संदर्भ :- आयुक्तांचे दिनांक 07/04/2018 चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./681/2018.

"महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीवरुन थेट पाणी पुरवठा होणाऱ्या भागासाठी महापे ते दिघा जलवाहिनी टाकणेच्या उपरोक्त विषयासंदर्भात मे. किशन कंस्ट्रक्शन या कंत्राटदाराबरोबर त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.50% जास्त दराने रू. 8,73,95,905/- इतक्या खर्चाने करार करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (क) अन्वये याप्रमाणे संमती देण्यात यावी, तसेच रक्कम रू. 8,73,95,905/- इतक्या रक्कमेस मा.सर्वसाधारण सभेची सुधारीत प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस करण्यात यावी."

**4. स्थायी समितीचा, दिनांक 20 एप्रिल 2018 चा ठराव क्र. 366 :-**

संदर्भ :- आयुक्तांचे दिनांक 07/04/2018 चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./674/2018.

"महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, सार्वजनिक रूग्णालय वाशी येथील 4 नग 20 पॅसेंजर कम स्ट्रेचर उदवाहने बसविणेच्या उपरोक्त विषयासंदर्भात मे. मारकोनी इलीव्हेटर कंपनी यांचेशी अंदाजित रक्कम रू. 1,11,56,000/- च्या 17% जादा दराने म्हणजेच रक्कम रू. 1,30,52,520/- इतक्या खर्चाने करार करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (क) अन्वये याप्रमाणे मंजूरी देण्यात यावी."

**5. महिला व बालकल्याण समितीचा, दिनांक 11 मे 2018 रोजीचा ठराव क्र. 13 :-**

संदर्भ :-आयुक्तांचे दिनांक 27/04/2018 चे पत्र क्र.नमुंमपा/स.वि.वि./1211/2018.

"महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, **महिला बालकल्याण समितीच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांच्या अनुषंगाने उत्पन्नाची मर्यादा रुपये 4 लाखपर्यंत करण्यास,** महिला व बालकल्याण समिती घटकांतर्गत योजनांमध्ये बदल करणेबाबत, तसेच प्रशिक्षणामध्ये **नव्याने बाब क्रमांक 13 म्हणून फ्लोरीस्ट - पुष्प सजावट हे प्रशिक्षण 6**

**महिने इतक्या कालावधी करीता, शैक्षणिक पात्रता 10 वी उत्तीर्ण आणि वयोमर्यादा 18 वर्षे** अशा प्रकारे समाविष्ट करण्यास तसेच **परिशिष्ट-अ** मधील निराधार/विधवा/परित्यक्ता/घटस्फोटीत महिलांच्या योजनेच्या अटी व शर्ती यातील अट क्र 4 ही उत्पन्न दाखल्याची अट वगळण्यास तसेच **अट क्र. 10** मध्ये जास्तीत जास्त दोन मुलींच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य मिळेल. तथापी एका आर्थिक वर्षात एका मुलीच्या विवाहास अर्थसहाय्य मिळेल. **याऐवजी एकाच मंडपात आणि एकाच वर्षात दोन्ही मुलींचे विवाह झाल्यास दोन्ही मुलींसाठी अर्थसहाय्य देणेस**, प्रस्तावातील नमूद करण्यात आलेल्या बाबींसह सुचविल्याप्रमाणे, मंजूरी देण्यात यावी."

**6.** शहाबाज-बेलापूर से.19/20 येथे जुन्या अंगणवाडीच्या ठिकाणी नवीन अंगणवाडी इमारत बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/05/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./890/2018.

**7.** कोपरखैरणे विभागातील प्र.क्र. 49 सेक्टर 10 येथील अंतर्गत रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 05/05/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./894/2018.

**8.** परिमंडळ -1 क्षेत्रातील (बेलापुर ते वाशी) हायमास्ट ची सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/05/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./899/2018.

**9.** सन 2018-19 या पावसाळ्यात वृक्ष लावगड करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/05/2018 चे पत्र क्र. न.मुं.म.पा./उद्यान/910/2018.

**10.** नवी मुंबई महानगरपालिका (मुख्यालय) येथील तळमजल्यावरील उपहारगृहाची जागा (उपहारगृह चालविणे यामध्ये नमुंमपा पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी/अभ्यागंत यांना चहा, नाष्टा, भोजन पुरवठा करणे या प्रयोजनासाठी) 5 वर्षाच्या कालावधीकरिता "परवानगी व अनुज्ञा" (लिव्ह ॲण्ड लायसन) तत्वावर देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/05/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/1437/2018.

**11.** नवी मुंबई महानगरपालिका स्वच्छता व साफसफाई उपविधी, 2017 लागू करण्यास व त्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करून उपविधीची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी परिमंडळ निहाय क्लिनअप मार्शल योजना राबविणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/05/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/उ.आ(स्व.म.अ.)/178/2018.

**12.** घणसोली प्रभाग क्रमांक-25 साळवी नगर येथे रस्त्याची सुधारणा करणे, ड्रेन, डक्ट व फूटपाथ बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/05/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/शअ/928/2018.

**13 ते 15. श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून आलेल्या दिनांक 12/04/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

**(13)** "प्रभाग क्र. 23, ऐरोली से.10 येथील न.मुं.म.पा. परिवहन बस क्र. 02 च्या बंद करण्यात आलेल्या कंट्रोल रूम जागी नागरिकांना निवाराशेड बांधण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(14) "प्रभाग क्र. 23, ऐरोली से. 10ए भू.क्र. 15 येथे सिडकोकडून संमिश्र शाळा या प्रयोजनासाठी वाटप झालेल्या भूखंडास संरक्षक भिंत बांधण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(15) "मुंबई महानगरपालिकेत असणाऱ्या जिजामाता उद्यान (रानीची बाग) तसेच तारापूरवाला मत्स्यालय (FISH AQUARIUM) व इतर देशात असणाऱ्या पक्षी उद्यान (BIRD PARK) यांना लक्षात घेता न.मुं.म.पा. क्षेत्रामध्ये पर्यटकांना तसेच नागरिकांना आकर्षित करण्यासारखे राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय प्रजातीचे पक्षी व समुद्री जीव आणून पक्षी उद्यान व मत्स्यालय न.मुं.म.पा. क्षेत्रात बांधण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**16 ते 18. श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून आलेल्या दिनांक 24/04/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(16) "नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडून नवी मुंबईतील रहिवाशी असलेल्या जेष्ठ नागरीकांना बस प्रवासासाठी बसभाडयामध्ये 100% सवलत देवून मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन दयावी. तसेच वातानुकुलित बससाठी 50% सवलत देण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(17) "प्रभाग क्र. 111 मधिल सेक्टर 44 येथील खराब झालेल्या नाल्याच्या जागी हेवी डयुटी नाले बांधणे तसेच त्यावर एफ.आर.बी. कव्हर टाकून नवीन फुटपाथ तयार करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(18) "प्रभाग क्र. 111 मधील सेक्टर 44 व 44ए या सेक्टर मधील मधल्या रस्त्यात रस्ता दुभाजक खराब झाला असून दुभाजक नसल्या सारखे झाले आहे. त्याठिकाणी पॅरॅबॉलिक रस्ता दुभाजक तयार करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**19 ते 21. श्रीम. शशिकला अनंत सुतार, यांजकडून आलेल्या दिनांक 03/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(19) "प्रभाग क्र. 10, ऐरोली, से. 20बी भूखंड क्र. 85 गुरूकूल शाळेसमोरील मद्यानात नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत तारेचे कुंपण घालण्याचे काम सुरू आहे. सदर मद्यानाची लालमाती, मुरूम टाकून मद्यानाचा समातोलपणा करून डागडुजी करून मद्यानाचे काम नागरिकांना सुविधेसाठी करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(20) "प्रभाग क्र. 10, ऐरोली येथील भूखंड क्रमांक 47 हा चिल्ड्रेन पार्कचे काम लवकरात लवकर करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(21) "प्रभाग क्र. 10, ऐरोली से.20बी भूखंड क्र. 85 येथील मद्यानात बहुउद्देशीय इमारत उभारण्यात यावी, सिडकोकडून महानगरपालिकेला मिळणाऱ्या अपुऱ्या भूखंडामुळे जनतेला सर्व सुविधा पुरविण्यातकरीता आपणांस अनेक भूखंडाची गरज भासणार आहे. परंतु एवढे भुखंड आपणांस मिळतील किंवा नाही याबाबत शंका आहे. त्यामुळे मिळालेल्या भुखंडावरच बहुउद्देशीय इमारत उभी करून सदर इमारतीमध्ये तळमजल्यावर भव्य ओपन स्टेज बांधण्यात यावे. पहिल्या मजल्यावर तरूणांसाठी जीम (व्यायामशाळा) बांधण्यात यावी. दुसऱ्या मजल्यावर अभ्यासिका व संगणक कक्ष बांधण्यात यावे. तसेच तिसऱ्या मजल्यावर महिलांसाठी उद्योग प्रशिक्षण वर्ग अशा प्रकारची सुविधा उभारून नागरिकांना एकाच इमारतीत सुविधा मिळतील, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**22 व 23. श्रीम. शिल्पा सुर्यकांत कांबळी, यांजकडून आलेल्या दिनांक 04/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(22) "प्रभाग क्र. 88, प्लॉट नं. 1, सेक्टर 29 मध्ये 600 मीटर भूखंड पार्किगसाठी रिकामा ठेवला आहे. त्या भूखंडाला सब डिव्हीजन करून 500 मीटर मध्ये बहुउद्देशीय इमारत बांधण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(23) "प्रभाग क्र. 88, सेक्टर 3 ते 11 येथे बस डेपो ते सैंट ऑगस्टीन शाळेपर्यंत नागरिक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात ये जा करीता असतात सदर रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने सदर ठिकाणी लवकरात लवकर स्कायवॉक बांधण्यात यावा, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**24 ते 26. श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून आलेल्या दिनांक 07/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(24) "प्रभाग क्र. 51, कोपरखैरणे मधील कै. दिनानाथ म्हात्रे उदयानाचे पुर्णपणे नुतनीकरण करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(25) "प्रभाग क्र. 51, कोपरखैरणे, से. 12 मधील स्मशानामागील बिना रहदारीचा भाग फेरीवाला क्षेत्र म्हणून आरक्षित करण्यात यावा, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(26) "प्रभाग क्र. 51, मधील कै. शंकर शेठ नाईक समाज मंदिराची डागडुजी करण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**27 व 28. श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून आलेल्या दिनांक 07/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(27) "प्रभाग क्र. 97 मधील सेक्टर 18 येथील वजीराणी स्पोर्टस क्लब ते सेक्टर 24 येथील सिडको कालीन गटार लाईन कमी व्यासाची असून ती वारंवार तुंबत असून त्यांचे पाणी आजूबाजूच्या सोसायटीमध्ये जाऊन त्याचा तेथील नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे.तरी तेथे मोठया व्यासाची गटार लाईन टाकण्यात यावी,असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(28) "प्रभाग क्र. 97 मधील सेक्टर 18अे मध्ये तलावाच्या बाजूच्या गार्डन मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र सर्व सुविधायुक्तांनी करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**29 ते 31. श्री.मुनावर पटेल, यांजकडून आलेल्या दिनांक 07/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(29) "प्रभाग क्र. 55, खैरणे गाव येथे महावीर वैभव बिल्डिंग ते रिलायन्स मॉल पर्यत दोन्ही बाजूला लोखंडी ग्रील बसविण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(30) "प्रभाग क्र. 55, कोपरखैरणे आणि खैरणे गांव येथील नागरिकांना चालण्यासाठी बॅरिअर फ्री व वॉकेबिलीटी संदर्भातील तत्सम काम करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(31) "प्रभाग क्र. 55, खैरणे गाव येथे खैरणे दफनभुमी ते कलश उदयानपर्यत तसेच हसन मिया पटेल चौक ते रिलायन्स फ्रेश मॉलपर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**32 ते 34. श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून आलेल्या दिनांक 07/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(32) "ई प्रभाग समितीच्या आवारामध्ये कॉक्रीटीकरण करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(33) "प्रभाग क्र. 45 मधील से. 3, 6 व 7 येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(34) "प्रभाग क्र. 45 मधील से. 3, येथील चिकणेश्वर उदयानामध्ये स्टॅप कॉक्रीटचे पदपथ करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**35 ते 37. श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून आलेल्या दिनांक 07/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(35) "प्रभाग क्र. 83 अंतर्गत असलेल्या स्मशानभूमीची ढासळलेली संरक्षक भिंत व गेट लवकरात लवकर बनविण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(36) "समाजातील बेसहारा वयोवृध्द विधवा स्त्रिया व विधुर पुरुष यांचेसाठी समाज विकास विभागातर्फे त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था होण्याच्या दृष्टीने आर्थिक मदतीची योजना राबवुन त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातुन जीवन जगण्यास सहाय्य करावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(37) "जुईनगर प्रभाग क्र. 83 तील ज्या गटारांच्या दोन झाकणांमध्ये 7 फुटांपेक्षा जास्त अंतर आहे ती गटारे नीट साफ करता येत नाही. गटारांची सफाई पुर्णपणे करता यावी यासाठी दर 7 फुटांवर किंवा जास्त अंतराच्या मध्यभागी झाकणांना जागा करून अजुन वाढीव झाकणे लावण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**38 ते 40. श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून आलेल्या दिनांक 08/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(38) "प्रभाग क्र. 96, नेरुळ, सेक्टर 16A येथील मलनि:स्सारण वाहिनी टाकण्याचे काम सिडकोकालीन असुन सदर मलनि:स्सारण वाहिन्या वारंवार ओवर फ्लो होऊन वाहत असतात. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तरी सदर ठिकाणी नवीन मोठया व्यासाची मलनि:स्सारण वाहिनी टाकण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(39) "प्रभाग क्र. 96, नेरूळ, सेक्टर 16A 16 व 18 येथील डेब्रीज कचरा पुर्णपणे साफ करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(40)** "प्रभाग क्र. 96, नेरूळ, सेक्टर 16A 16 व 18 येथे वाहनाचे नियम दर्शविणारे दिशादर्शक व सुचनाफलक बसविण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**41 ते 43. श्री. संजू आधार वाडे, यांजकडून आलेल्या दिनांक 08/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

**(41)** "प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 येथील प्रतिभा सोसायटी तसेच लव व्हिला सोसायटी लगतच्या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(42)** "प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 येथील बि. विभाग तसेच सी विभागामधील रस्त्यालगतची गटार गेली 15 ते 20 वर्षांपूर्वी विट बांधकाम करून बांधलेली असून सदर गटारातील पाणी नागरीकांच्या घरांमध्ये जाते, तरी सदर गटाराचे हेवी डयुटी बांधकाम करुन देण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(43)** "प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 येथील ज्ञानदिप शाळेमागील उदयानाला लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नाव देण्यात आले आहे. तरी सदर उदयानास उत्तम दर्जाचे गेट कमान तयार करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**44 ते 46. श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून आलेल्या दिनांक 08/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

**(44)** "प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागात पावसाळी गटार बांधण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(45)** "न.मुं.म.पा. पाणी पुरवठा विभागाकडून नवीन नळ जोडणी केल्यावर पाणी मीटरकरीता शुल्क घेते किंवा बाहेरून शुल्क देऊन पाणी मीटर आणावा लागतो तो पूर्वी प्रमाणे पालिकेकडून नि:शुल्क(मोफत) देण्यात यावा, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(46)** "प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागात विद्युत विभागाकडून लाईट पोलवर एल.ई.डी.(LED) लाईट बसविण्यात याव्यात, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**47 ते 49. श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून आलेल्या दिनांक 08/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

**(47)** "प्रभाग क्र. 47, कोपरखैरणे मध्ये एल.ई.डी. स्ट्रीटलाईट बसविण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(48)** "प्रभाग क्र. 47, कोपरखैरणे, सेक्टर 5 मध्ये रूम क्र. 10 ते रूम क्र. 328 येथील गटर हेवीड्युटी करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(49)** "प्रभाग क्र. 47 कोपरखैरणे मध्ये अंतर्गत व बाह्य रस्ते डांबरीकरण करण्यात यावे., असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**50 व 51. डॉ. जयाजी के. नाथ, यांजकडून आलेल्या दिनांक 08/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

**(50)** "सी.बी.डी. बेलापूर हायवे सर्कल जवळ ट्राफिक पोलिस चौकीच्या बाजूला मोकळ्या जागेवर सी.बी.डी. मधील नागरीक मोठ्या संख्येने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाण्यासाठी वाहनांची वाट पाहत ऊन वारा व पाऊस यांची तमा न बाळगता उभे असतात. ऐरोलीमध्ये ज्या धर्तीवर बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांसाठी निवारा शेड उभारले आहे. त्याच धर्तीवर सी.बी.डी. मधील प्रवाशांसाठी लवकरात लवकर निवारा शेड उभारण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(51)** "सी.बी.डी. ते तळोजाला जाण्यासाठी मेट्रो रेल्वेचे काम अत्यंत जोमाने सुरू आहे व त्या मेट्रो रेल्वेचे पहिले स्टेशन माझ्या प्रभागात म्हणजे सी.बी.डी. सेक्टर 05 मध्ये असून त्या रोडवरील डिव्हायडर व लगतच असणारे उद्यान लवकरात लवकर नव्याने बनविण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**52 ते 54. श्री. आकाश बाळकृष्ण मढवी यांजकडून आलेल्या दिनांक 10/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

**(52)** "प्रभाग क्र. 14, ऐरोली, से. 19 मालसा हाईट्स ते ऐरोली टॉवर व से.19 पाण्याची टाकी परिसरपर्यंत नवीन पदपथ बनविण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(53) "प्रभाग क्र. 14, ऐरोली, से.19 भूमी कोळसा सोसायटी ते काकासाहेब थोरात सोसायटी ते रामदेव अपार्टमेंटपर्यंत रस्त्याची सुधारणा करण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(54) "प्रभाग क्र. 14, ऐरोली, से. 20 त्रिशुल सोसायटी ते शुल सोसायटीपर्यंत हेवी ड्युटी गटार बनविण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**55 ते 57. श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून आलेल्या दिनांक 10/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(55) "प्रभाग क्र. 11, ऐरोलीगांव सदानंद अपार्टमेंट ते मिलिंद पाटील यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. रोड बनविण्यात यावा, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(56) "प्रभाग क्र. 11, ऐरोलीगांव येथील गटारांची दुरूस्ती करून P.C.C. करण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(57) "प्रभाग क्र. 11, ऐरोलीगांव येथील छत्रपती रहिवाशी संघ ऐरोली येथे नवीन लाईटचे पोल लावण्यात यावेत, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**58 ते 60. श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून आलेल्या दिनांक 10/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

(58) "प्रभाग क्र. 48, पावणेगांव येथील संत भगवानबाबा बगीचा येथे सांस्कृतिक व योगा केंद्रासाठी स्टेज बनविण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(59) "प्रभाग क्र. 48, श्रमिकनगर, C.E.T.P. च्या समोरील रस्त्यानजिक (A ब्लॉक रस्त्यानजिक) शौचालय बांधण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(60)** "प्रभाग क्र. 48, पावणे स्मशानभूमीमध्ये पिण्यांच्या पाण्यासाठी तसेच जळाऊ लाकूड व्यवस्था त्याचप्रमाणे सुरक्षा रक्षक साफसफाई कर्मचारी यांची नेमणूक करण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**61 व 62. श्री. घन:शाम रतन मढवी, यांजकडून आलेल्या दिनांक 10/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

**(61)** "प्रभाग क्र. 31, घणसोली खाडी किनारी जेटी (छोटे बंदर) असून सदर ठिकाणी मासेमारी, दशक्रिया विधी, अस्थी विसर्जन इत्यादी कार्य केले जात असून, सदर ठिकाणी शौचालय, पिण्याचे पाणी, निवारा शेड इत्यादी व्यवस्था करण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(62)** "घणसोली गांव परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत मोबाईल टॉवर असून, सदर मोबाईल टॉवर हटविण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**63 ते 65. श्रीम. सीमा चिंतामण गायकवाड, यांजकडून आलेल्या दिनांक 10/05/2018 च्या ठरावाच्या सूचना :-**

**(63)** "प्रभाग क्र. 31, घणसोली येथे मोठ्या प्रमाणात पदपथ, गटार, सिव्हरेज लाईन खराब झाले असून समर्थनगर, गावदेवीवाडी, म्हसेश्वर नगर, चिंचआळी या परिसरातील सर्व कामे लवकरात लवकर करण्यात यावीत, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(64)** "प्रभाग क्र. 31, घणसोली मधील गुणाली तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साचला असून तात्काळ पाण्याचा उपसा करून गाळ काढण्यात यावा, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**(65)** "प्रभाग क्र. 31, घणसोली मधील डी-मार्ट ते गुणाली हा परिसर रहदारी रस्ता असून सदर ठिकाणी एकही विजेचे पोल नाही, लवकरात लवकर तेथे विजेचे पोल लावण्यात यावेत, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**66. श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून आलेली दिनांक 11/05/2018 ची ठरावाची सूचना :-**

"नवी मुंबईचा पामबीच मार्ग हा दिवसेंदिवस मृत्युचा सापळा बनत चालला आहे. या रस्त्यावर कारचालक, दुचाकीस्वार अत्यंत वेगाने वाहने चालवत असतात. कधी कधी रात्रीच्या वेळी काही दुचाकीस्वार स्पर्धा लावत असतात. वाहनावरील नियंत्रण सुटल्यामुळे अनेकदा अपघात घडले आहेत आणि यात युवा तरूण तरूणीचा मृत्यु झाल्याचे समोर आलेले आहे. युवा पिढी यामुळे जीवन जगण्याआधी उध्वस्त होत आहे. तरी याबाबीचा गांभीर्याने विचार करावा आणि पामबीच मार्गावर द्रुतगती मार्गाप्रमाणे किमान दुचाकी आणि सायकल यांना बंदी करण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक : 11 मे 2018.**